MHOS090013782024

**<u>आदेश नि.क्र. ४८ वर</u>**

अर्जदार वादी यांनी प्रस्तुत अर्ज वादी क्र.२ सत्यभामा मल्लीकार्जून घोडके यांचा मृत्यु दिनांक ११/०७/२०२५ रोजी झाल्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळावी म्हणून व तशी दुरूस्ती दाव्यात करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**२.** वादी/अर्जदाराचे कथन असे की, दिनांक ११/०७/२०२५ रोजी वादी क्र. २ सत्यभामा मल्लीकार्जून घोडके यांचा मृत्यु झाला आहे. मयत वादी क्र.२ यांना त्यांच्या पश्चात अर्जात नमुद केल्याप्रमाणे तीन मुली व पती असे वारस आहेत. त्यामुळे अर्जात दर्शविलेले वारस क्र. १ ते ४ यांना वादी क्र.२ चे वादी क्र. २/१ ते २/४ म्हणुन अभिलेखावर घेण्याची व तशी दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

**३.** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींनी म्हणणे दाखल करून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**४.** वादींनी वादी क्र.२ मयत झाल्याचे कथन प्रस्तुत अर्जामध्ये केले आहे. सदर कथनाचे पुष्टयर्थ त्यांनी शपथपत्र दाखल केले आहे. तसेच वादी क्र.२ मयत झालेबाबत मृत्यू प्रमाणपत्र निशाणी क्र. ४५ खाली दाखल केले आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर

केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषांवर निकाली काढण्याकरीता वादी/ अर्जदार यांचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित आहे. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करते.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज (नि.क्र.४८) मंजुर करण्यात येतो.

२. अर्जात नमुद मयत वादी क्र. २ यांचे वारस पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर घेण्यात यावे व तशी दुरूस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

Sd/-

(अमृता धोंडीराम जाधव)
३रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
कळंब.

दिनांक ०९/०६/२०२६